# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 24/02/2023 (शुक्रवार) सकाळ

---

## चोरी

**पो.स्टे. वेलतूर** :— अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा म्हसली येथे दिनांक १९/०२/२०२३ चे रात्री १२.०० वा. पासुन दिनांक २०/०२/२०२३ चे रात्री १२.०० वा. दरम्यान मौजा म्हसली पुर्नवसन येथील गावातील लघुदाब विद्युत वाहीनीचे ३९ स्पॅन ॲल्यूमीनियम तार किंमती अंदाजे ७०,०००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रोशन पुंडलीकराव लवनकर (कनिष्ठ अभियंता) वय ३५ वर्ष रा. मांढळ ता. कूही जि. नागपूर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतूर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अशोक जाधव पोस्टे वेलतूर मो. क्र. ९३५९९४७९५० हे करीत आहे.

## दुखापत

**१) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील धरमनगर कन्हान येथे दिनांक २२/२/२०२३ चे १९.०० वा. ते १९.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. वर्षा पुरुशोत्तम आकोले, वय २९ वर्ष रा. दुर्गा मंदीर जवळ पिपरी वार्ड क्र. ०२ कन्हान व आरोपी नामे— जयपाल सोनकुंवर रा. धरमनगर कन्हान हे मुलगी व वडील असुन वडील हे दारु पिण्याचे सवयीचे असल्याने नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी ही आपल्या आईकरीता जेवणाचा डब्बा घेवुन गेली असता आरोपी आणि फिर्यादीची आई यांचे झगडा भांडण सुरु होते फिर्यादी ही त्यांचे मधात भांडण सोडवायला गेली असता यातील आरोपीने फिर्यादी सोबत धक्का बुक्की करुन भाजीपाला कापण्याच्या पावशीने फिर्यादीच्या उजव्या हाताचे पंज्यावर मारुन फिर्यादीला जखमी करुन फिर्यादीचा पती तसेच आईला आरोपीने शिवीगाळी करुन जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार काटे ब. नं ६४३ पोस्टे कन्हान मो. नं. ९०११३२६७९३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत मौजा दिगलवाडी पेट्रोलपंप येथे दिनांक २३/०२/२०२३ चे १४.३० वा. ते १५.०० वा. दरम्यान आरोपी नामे– प्रफुल शंकर थोटे, रा. दिगलवाडी पारशिवनी हा पेट्रोलपंपवर आला व फिर्यादी नामे– बबलू मधुकर कठाने, वय २९ वर्ष, रा. दिगलवाडी ता. पारशिवनी याला म्हणाला की ''तूझी आई माझ्या बायकोला काउन भडकवते आता मी पन तूया बायकोला भडकवतो'' असे म्हणून फिर्यादीला धमकावले व हातातील चाकूने फिर्यादीच्या उजवे हातावर व पोटावर उजव्या भागास चाकूने मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार रवी बर्वे ब. नं. १४९० पोस्टे पारशिवनी मो. क्र. ८८३०५६५०७६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**